दिनांक :- २५.१२.२०१७.

# अर्ज

**प्रति,**
**मॅनेजर (TL)**
**पावर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया,**
**भारत सरकार का उपक्रम, औरंगाबाद.**

**विषय :-** ७६५ के. व्ही. औरंगाबाद - पडघे दुहेरी परिपथ वाहिनीचे कामादरम्यान झालेल्या पिक नुकसानीचा मोबदला व तारेखाली येणाऱ्या जमिनीचा मोबदला मिळणेबाबत......

**अर्जदार :-** श्री. मंजाबापू आनंदा पठारे ( गट क्र. ११८५ मु. पो.- देवळाली प्रवरा, कोल्हार रोड, ता.- राहुरी. जि. अहमदनगर.)

महोदय,

मी खाली सही करणार श्री. मंजाबापू आनंदा पठारे विनंतीपूर्वक अर्ज करतो की, माझे शेत गट क्र. ११८५, मौजे देवळाली प्रवरा येथून आपली ७६५ के. व्ही. औरंगाबाद-पडघे दुहेरी परिपथ वाहिनीचे काम साधारणतः ८ महिन्यांपूर्वी झाले असून सदर वाहिनीचा कुठलाही मनोरा माझे शेतात येत नाही परंतु सदर वाहिनीचे तारा ओढण्याचे काम करत असताना माझे शेतातील कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यासंदर्भात आपल्या तत्कालीन प्रतिनिधीने योग्य मोबदला देनेबाबत तोंडी आश्वासन दिले होते, परंतु त्यादरम्यान आपल्या वाहिनीचे माझे शेतातील काम पूर्ण करून घेतले व माझे कांदा पिकाचे झालेले नुकसानीचा कुठलाही पंचनामा केला नाही तसेच कुठलाही मोबदला दिलेला नाही.

तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/उर्जा-४,मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक ३१ मी २०१७. नुसार अति उच्च दाब वाहिनीच्या तारांखालील जमिनीचा जमीन अधिग्रहण न करता मूल्यांकनाच्या १५% रक्कम मोबदला म्हणून देय ठरीविली आहे. त्यानुषंगाने माझे शेतावरून (गट क्र. ११८५) साधारणतः २५० मीटर लांब वीज वाहक तारा गेलेल्या आहेत व ७६५ के. व्ही. वाहिनीचा आर. ओ. डब्लू. हा ६७ मीटर आहे तसेच शासन निर्णय क्रमांक : धोरण-

२०१६/प्र.क्र.५२०/उर्जा-४,मंत्रालय, मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मी २०१७. मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कुठल्याही प्रकारचा पंचनामा/ मोबदला आजपावेतो मिळालेला नाही.

तरीही माझे संपूर्ण कुटुंब व मी पूर्णतः शेतीव्यवसायावर अवलंबून असल्यामुळे मी मे. साहेबांना विनंती करतो की, माझ्या अर्जाचा सहनिभूतीपुर्वक विचार करून लवकरात लवकर पिकाच्या नुकसान भरपाईचा तसेच जमिनीचा मोबदला (शासन निर्णयाप्रमाणे) देण्यात यावा.

आपला विश्वासू,

श्री. मंजाबापू आनंदा पठारे,
(गट क्र. ११८५ मु. पो.- देवळाली प्रवरा,
कोल्हार रोड, ता.- राहुरी. जि. अहमदनगर.
पिन कोड ४१३७१६)
मोबाईल क्र. ९८९०२९०७०७.

प्रत सविनय सादर:-

१) मा. चंद्रशेखर बावनकुळे साहेब, मंत्री,उर्जा व उद्योग व कामगार विभाग, मुंबई.
२) मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर.